प्रेसनोट

दि.०२/०६/२०१९

## कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर

## वेश्या व्यवसायातून पर राज्यातील मुलींची सुटका

दि.०१/०६/२०१९ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.मदन बहाद्दरपुरे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कोरेगाव पार्क, लेन नं.५, नॉर्थ मेन रोड, वेलनेस मेडीकल स्टोअरशेजारी, ओऍसिस सलून अँड स्पामध्ये मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय केला जात असुन त्यासाठी गिऱ्हाईकामागे चार ते पाच हजार रुपये घेतले जातात. सदर स्पा सेंटरमध्ये थेरीपीस्ट मुली मसाज करण्यासाठी ठेवलेल्या असून त्यांना ज्यादा पैश्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याबाबत खात्रीशीर बातमी मिळाल्याने, पोलीस स्टेशन कडील अधिकारी व स्टाफ व पंचासह कोरेगाव पार्क, लेन नं.५, नॉर्थ मेन रोड, वेलनेस मेडीकल स्टोरशेजारी, ओऍसिस सलून अँड स्पा येथे जावून छापा घातला असता छाप्यामध्ये वेगवेगळया राज्यातील तीन पीडित मुली मिळून आल्या. सदर मुलींकडून स्पाचे मालक (१) विशाल शंभू पंडीत, वय २१ वर्षे, वय २१ वर्षे, धंदा स्पा व मसाज सेंटर, रा.लेन नं.५, ट्रिनीटी कोर्ट, सी बिल्डिंग, फ्लॅट नं.४०२, कोरेगाव पार्क, पुणे व स्पामधील नोकर नामे (२) आदित्य सुलेमान, वय २१ वर्षे, धंदा स्पामध्ये नोकरी, रा. सदर हे वेश्या व्यवसाय करवून घेत असल्याचे व सदर मुली हया गरीब घरातील असल्याचे समजल्याने व त्यांचे गरीबीचा फायदा घेवून, त्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांचेकरवी वेश्या व्यवसाय करून घेत असताना मिळून आल्याने वर नमूद स्पा मालक व त्याचा नोकर यांचेविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व नमूद पीडित मुलींची वेश्या व्यवसायातून सुटका करण्यात आलेली आहे व नमूद पीडित मुलींना रेस्क्यु फाऊंडेशन, हडपसर, पुणे येथे संरक्षणकामी ठेवण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे व पोलीस कर्मचारी दिनेश शिंदे, जयश्री ढोमे, सारीका सोनावणे, दळवी, सावंत यांनी कारवाई केलेली आहे.

**प्रेसनोट** **दि.०२/०६/२०१९**

## कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर

## पर राज्यातील पीडित मुलींची वेश्या व्यवसायातून सुटका

दि.०१/०६/२०१९ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.मदन बहाद्दरपुरे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एजंट सूरज व मोहित हे वेगवेगळया हॉटेलमध्ये मुली ठेवून ते स्वत: मुलींचे फोटो पाठवून वेश्या गमनसाठी रक्कम ठरवून ग्राहकांच्या मागणीनुसार मुली कोरेगाव पार्क येथील हॉटेलवर वेश्या गमनासाठी पाठवितात व ते वेश्या गमनाकरिता आलेल्या मुली मार्फत वेश्या गमनाचे पैसे स्वीकारतात. त्यातून स्वत:साठी ठराविक हिस्सा काढून घेवून त्यावर स्वत:ची उपजीविका भागवितात, अशी बातमी मिळाल्याने सदर बातमीप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मदन बहाद्दरपुरे व पोलीस निरीक्षक, (गुन्हे) माने व कोरेगाव पार्क पो.स्टे. कडील स्टाफ व पंचासह **नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क येथील पंचतारांकित हॉटेल ओ, रूम नं.३०७ व ३०८, कोरेगाव पार्क, पुणे** येथे जावून छापा घातला असता छाप्यामध्ये पश्चिम बंगाल व गुजरात येथील दोन पीडित मुली मिळून आल्या. सदर मुलींकडून एजंट सूरज व मोहित हे वेश्या व्यवसाय करवून घेत असल्याचे व सदर मुली हया गरीब घरातील असल्याचे समजल्याने व त्यांचे गरीबीचा फायदा घेवून, त्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांचेकरवी वेश्या व्यवसाय करून घेत असताना मिळून आल्याने वर नमूद आरोपी यांचेविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व नमूद पीडित मुलींची वेश्या व्यवसायातून सुटका करण्यात आलेली आहे व नमूद पीडित मुलींना रेस्क्यु फाऊंडेशन, हडपसर, पुणे येथे संरक्षणकामी ठेवण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे व पोलीस निरीक्षक, (गुन्हे) तसेच पोलीस उप निरीक्षक चाळके, पोलीस कर्मचारी निशीकांत सावंत, हर्षदा शिंदे, रोहिणी दुंडे यांनी कारवाई केलेली आहे.